# प्रेस नोट

जा.क्र.६०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०८/२०१७

## ''सामाजीक एकता व पोलीस या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजन''

भंडारा:— पोलीस अधीक्षक भंडारा मा. विनीता साहु यांचे संकल्पनेतुन दिनांक ३०/०८/२०१७ रोजी पोलीस मिटींग हॉल मध्ये ''सामाजीक एकता व पोलीस'' या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजीत करण्यात आली. याकरीता कार्यक्रमात जकादर कन्या उच्च माध्यमीक विद्यालय भंडारा, नुतन कन्या विद्यालय भंडारा, महिला समाज विद्यालय भंडारा, सेंट पॉल इंग्लीश स्कुल विद्यालय भंडारा, संत शिवराम महाराज विद्यालय भंडारा, सन्नीज स्प्रींग डेंल विद्यालय भंडारा, नुतन महाराष्ट्र विद्यालय भंडारा या सर्व शाळेतील ५१ मुले व मुलीनी सहभाग घेतला.

सदर कार्यक्रमामध्ये मा. पोलीस उपअधिक्षक गृह भंडारा श्री. कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात जातीय सलोखा समाजात टिकुन कशी राहावी याबाबत माहिती दिली, या समाजामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहतात, जाती धर्माच्या रुढी परंपरे बद्दल आपल्या तसेच दुस—याच्या परंपरेबद्दल आदर करावा. सामाजीक एकता पंढरवाडा कायम ठेवुन ज्या समाजात आपण राहतो. त्या समाजामध्ये अनेक जाती धर्माचे, वंशाचे, नागरीक राहतात, प्रत्येक धर्माची प्रार्थना करण्याची पध्दत वेगवेगळी असुन भारत देश त्यापैकी एक आहे, तसेच काही अफवा पसरविणारे समाजामध्ये दृष्ट भावना असणारे लोक समाजामध्ये तणाव निर्माण करतात.

सदर कार्यक्रमामध्ये मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु यानी आपले मार्गदर्शपर भाषण व्यक्त करतांना तुम्ही भारताचे भावी शिल्पकार आहात. जातीय सलोखा मध्ये सामाजीक एकता यांच्यात पोलीसांची भुमीका तसेच तुमचीही भुमीका असते, फेसबुक, व्हाटऑप याचा वापर चांगल्या गोष्टी करीता करावा, तसेच मुलांना काही त्रास असल्यास पोलीस धावुन येण्यास तयार असतो, त्याचप्रमाणे सर्वाकरीता १०० नंबर तसेच मुलीकरीता टोल फ्री नंबर काढण्यात आले. या चित्रकलेच्या माध्यमातुन सामाजीक एकता तसेच पोलीसांची भुमीका दिसुन येत आहे. पोलीस जनतेच्या पाठीमागे धावुन येतो तरी जनतेची भुमीका पोलीसा प्रती लापरवाहीची दिसुन येत आहे. सर्व मुलांनी चित्र चांगले काढले त्याचे चित्र पोलीस मुख्यालय, पोलीस स्टेशन तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयात चित्रांना फ्रेम करुन लावण्यात येणार असे सांगीतले.

कार्यक्रमामध्ये चित्रकला स्पर्धामध्ये प्रथम पारीतोषीक श्रेया खेमचंद निखाडे, स्प्रिंग डेल स्कुल भंडारा, द्वितीय पारीतोषीक ऋतृजा प्रदीप डोंगरे , स्प्रिंग डेल स्कुल भंडारा तृतीय पारीतोषीक मयुर लक्ष्मण साठवणे, बंसीलाल लाहोटी विद्यालय भंडारा यांनी घेतले त्यांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले त्याचप्रमाणे त्यामध्ये भाग घेण्याऱ्या सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. त्याबरोबरच उपस्थित पर्यवेक्षक श्री. पी. व्ही रंगारी, महर्षी विदयामंदीर, आर. बी. मेश्राम, नुतन महाराष्ट्र विद्यालय, गोपाले मेश्राम, स्प्रिंग डेल, शुभांगी गिन्हेपुंजे ,जकारदर कन्या विद्यालय भंडारा यांचे स्वागत मान्यवरांनी केले.

सदर कार्यक्रमामध्ये मा पोलीस अधीक्षक विनीता साहु , मा. पोलीस उप अधिक्षक गृह भंडारा श्री. कुलकर्णी जिवीशा कार्यालय भंडारा पोनी. एम. एम. सिडाम, सपोनी. के.एम.हत्तीमारे, रापोनी पोलीस मुख्यालय भंडारा श्री. वर्मा, कल्याण शाखा भंडारा, व्हिडीओ फोटो ग्रॉफर पोलीस नियत्रंण कक्ष भंडारा याचा सहभाग होता. दोषसिध्दी शाखेतील पोलीस उपनिरीक्षक आडोळे, यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन पोनी. सिडाम जिवीशा यांनी केले. तसेच राष्ट्र गिताने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

**पोनी. एम. एम. सिडाम**
**जिवीशा शाखा भंडारा**
**दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.